# कामगार आणि ग्राहकांसाठी दुकाने सुरक्षित कशी करावीत

भारतीय वैज्ञानिकांचा कोविड-१९ आह्वानाला प्रतिसाद

https://indscicov.in/

IndiSciCovid

Indian Scientists' Response to COVID-19

**प्रस्तावना**



कोविड-१९ रोगाचा सामना करण्यासाठी लॉकडाऊन लागू केला असला तरी जीवनावश्यक वस्तूंची दुकाने (किराणा, मेडिकल, इ.) चालू ठेवायला सरकारनं परवानगी दिली आहे. बरेच लोक अशा ठिकाणी एकत्र जमत असल्यामुळे अशी ठिकाणे या रोगाच्या प्रसाराचे हॉटस्पॉट बनू शकतात. पृष्ठभाग स्वच्छ ठेवणे, दोन व्यक्तींमध्ये पुरेसे अंतर राखणे आणि हात धुणे अशा नेहमीच्या खबरदाऱ्यांच्या बरोबरीने आणखीही काही खबरदाऱ्या जीवनावश्यक सेवा देणाऱ्यांनी घेणे गरजेचे आहे.

यामुळे तुम्ही, तुमचे सहकारी आणि तुमचा परिवार सुरक्षित आणि निरोगी राहायला मदत होईल, आणि तुम्ही अखंडितपणे सर्वसामान्यांना जीवनावश्यक सेवा देत राहू शकाल .

**दुकानदारांसाठी मार्गदर्शक सूचना:**



कोविड-१९ महामारी दरम्यान नियमितपणे हात धुणे आणि हात चेहऱ्याला लागू न देणे ही खबरदारी घेणे गरजेचे आहे! ही खबरदारी दुकानातील सर्व कामगारांनी काटेकोरपणे घ्यायला हवी. ग्राहकांशी बोलताना मास्क वापरणे आवश्यक आहे. याहून अधिक काळजी घ्यायची असेल तर एप्रन, टोपी आणि हातमोजे यांचा वापर करावा.

जर तुम्ही रेशनदुकानाप्रमाणे सुट्टे आणि खुले पदार्थ यांची विक्री करत असाल, तर ग्राहकापासून अंतर राखण्यासाठी प्लास्टिकची रुंद नळी किंवा लांब नरसाळे यातून माल थेट ग्राहकांच्या पिशवीत पडेल अशा सारख्या साध्यासोप्या तरकिबी वापरता येतील.

**तुम्ही आजारी असल्यास:**



जर तुम्ही अथवा दुकानात काम करणारी कोणीही व्यक्ती यांच्यामध्ये खोकला किंवा ताप यासारखी कोविड-१९ची लक्षणे दिसली तर त्यांनी सुट्टी घेऊन घरी राहावे. अशा कामगारांना मालकांनी शक्यतो भरपगारी सुट्टी द्यावी, म्हणजे सदर कामगार बरा होण्याची आणि इतर कामगार व ग्राहक यांच्याकडे रोगाचे संक्रमण न होण्याची खात्री राहील.

**वैयक्तिक / घरगुती स्वच्छता:**



दिवसभर तुमच्यावर जमा झालेले विषाणू तुमच्या कुटुंबात पसरू नयेत म्हणून बाहेरून आल्याबरोबर साबणाने अंघोळ करावी. दिवसभर तुम्ही घातलेले कपडे एका वेगळ्या बादली मध्ये टाकून शक्यतो लगेच डिटर्जंट व पाण्याने धुवून टाकावेत.

**माल खरेदी आणि दुकानात उतरवून घेणे:**

सार्वजनिक ठिकाणी इतरांपासुन १-२ मीटर ठेवणे (सोशल डिस्टन्सिंग) महत्वाचे. जिथून दुकानदार माल खरेदी करतात अशा घाऊक

बाजारापेठेतही पुरेसे अंतर ठेवून रांगेने माल खरेदी करण्याची यंत्रणा असावी. बाहेर पडताना मास्क वापरावा, आणि बाहेरून परत आल्यावर हात साबणाने स्वच्छ धुवावेत. पैशाचे व्यवहार शक्यतो ऑनलाइन करावेत.



दुकानासाठी आलेली सामानाची खोकी बाहेरच उतरवून घेऊन तिथेच उघडून आतील माल स्वच्छ हातांनी दुकानात न्यावा. खोकी उघडण्यापूर्वी जिथून उघडायची तो भाग आणि खोक्यांना जिथे हात लावावे लागतात असे सर्व भाग साबणपाण्याने पुसून घ्यावेत.



**वस्तू आणि सामानाची साठवण:**

तांदूळ डाळ यांसारखे खुले सुटे पदार्थ झाकण असलेल्या बंद डब्यांमध्ये ठेवावेत. दिवसाअखेर हे डबे साबणाच्या पाण्यात बुडवलेल्या कापडाने पुसून घ्यावेत. सीलबंद वस्तू (उदा. बाटल्या, बंद पिशव्या, खोकी) शेल्फवर ठेवायला हरकत नाही, कारण साधारणतः अशा वस्तू सीलबंद खोक्यांमधूनच येतात आणि नजीकच्या काळात हाताळल्या गेल्या नसल्याने त्यावर विषाणू असण्याचा धोका कमी असतो. फळे आणि भाज्यांसारखा नाशिवंत माल खुल्या दर्शनी भागात ठेवण्यास हरकत नाही. ग्राहकांनीही असा माल, तसेच धुता येण्याजोग्या सीलबंद आवरणातील माल, हे नीट धुवून घेणे गरजेचे आहे.. विषाणू पसरू नये म्हणून जी वस्तू विकत घ्यायची तेवढ्याच वस्तूला हात लावावा हे ग्राहकांना समजावून सांगावे.

**वस्तूंची विक्री:**

प्रत्येकानेच बाहेर पडताना पुन्हा वापरता येण्याजोगा कापडाचा मास्क अथवा एकापेक्षा जास्त थर असलेल्या आवरणाने आपला चेहरा झाकणे गरजेचे आहे. दुकानदारांनी गोडव्याने पण आग्रहापूर्वक ग्राहकांना मास्क किंवा आवरण घालण्याची विनंती करावी. चेहऱ्याचा मास्क आणि आवरण आणि त्यांची गरज यांबद्दल माहिती देणारी पत्रके / पोस्टर्स दुकानाच्या प्रवेशद्वाराजवळ लावावीत. अशी पोस्टर्स आमच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

दुकानाच्या आकारानुसार खालीलपैकी एक विक्रीची पद्धत वापरावी:

पर्याय १: (लहान घरगुती दुकानांसाठी)



ग्राहकांना आत येऊ न देता दारातच किंवा दाराजवळ सेवा द्यावी. लवकर आणि कार्यक्षम सेवेसाठी ग्राहकांना सामानाची यादी करून घेऊन यायला उत्तेजन द्यावे.

पर्याय २: (मोठ्या घरगुती दुकानांसाठी)

दुकानात आत येणाऱ्या सर्व ग्राहकांना हात स्वच्छ करण्यास सांगावे. शक्य असल्यास प्रवेशद्वाराजवळ साबण आणि वाशबेसीनची सोय करावी. तसेच ग्राहकांना हात पुसण्यासाठी पेपर नॅपकिन आणि वापरलेल्या नॅपकिनच्या विल्हेवाटीसाठी स्वतंत्र कचरापेटीची सोय करावी. याला पर्याय म्हणून अल्कोहोलयुक्त हँड सॅनिटायझर (किमान ६०% अल्कोहोलसहित) दाराशी उपलब्ध करून द्यावा. दुकानाचे दरवाजे शक्यतो उघडे ठेवावेत, म्हणजे ग्राहकांना दरवाजा उघडण्यासाठी हात लावावा लागणार नाही. हवा उत्तम प्रकारे खेळती राहावी म्हणून खिडक्या उघडून ठेवाव्यात.

एका वेळी दुकानात असणाऱ्या ग्राहकांची संख्या मर्यादित ठेवावी. ही संख्या दुकानाच्या आकारानुसार आणि दोन व्यक्तींमध्ये १-२ मीटर राहील याची काळजी घेऊन ठरवावी.

पर्याय ३: (उघड्यावरची  दुकाने / घाऊक बाजार)

उघड्यावरची दुकाने आणि घाऊक बाजार यांमध्ये विषाणू स्थिरावण्याजोगे आणि पसरण्याजोगे पृष्ठभाग थोडे

असतात. तरीसुद्धा दोन दुकानांमध्ये आणि इतरांपासून १-२ मीटर अंतर राखले पाहिजे. आपला परिसर कचरामुक्त आणि स्वच्छ ठेवणे एक चांगली आरोग्यदायी सवय आहे. दिवसभर कचरापेटीत गोळा केलेल्या कचऱ्याची दिवसअखेर योग्य ठिकाणी योग्य पद्धतीने विल्हेवाट लावावी.



**रांगा:**

दुकानाबाहेर ग्राहकांना रांगेत थांबावे लागू शकते. ग्राहकांना रांगेत एकमेकांपासून पुरेसे अंतर राखण्यास सांगावे. त्यासाठी दुकानाबाहेर फरशीवर अथवा रस्त्यावर दर १-२ मीटर अंतरावर वर्तुळे अथवा खुणा करून घ्याव्यात.

दिवसा अखेर कड्याकोयंडे, झाकणे, टेबल, कॅश बॉक्स यांसारखे पृष्ठभाग साबणाच्या पाण्याने स्वच्छ करावेत. इतर वारंवार वापरात येणारे पृष्ठभाग, उदा. नळ, दरवाजांचे हँडल, कुलपे, फ्लशबटण, इ., हे सुद्धा न विसरता साबणाच्या पाण्याने स्वच्छ करावेत. स्वच्छतागृहे आणि वॉशबेसीन रोज साबण आणि पाण्याने स्वच्छ करावीत, आणि त्यानंतर १% ब्लीच वापरून दिवसातून काही वेळा नियमितपणे निर्जंतुक करावीत.



पुन्हा वापरण्यायोग्य टोप्या, मास्क्स आणि एप्रन इतर कपड्यांपासून वेगळे आणि डिटर्जंट वापरून धुवावेत. प्रत्येक कामगाराला दररोज या वैयक्तिक सुरक्षेसाठीच्या वस्तूंचे स्वतंत्र किट. डिस्पोजेबल मास्क, हातमोजे, कॅप्स, एप्रन यांची विल्हेवाट सुरक्षितपणे लावायची पद्धत पुढीलप्रमाणे: प्रथम या वस्तू १% घरगुती ब्लीचने निर्जंतुक करून घ्याव्यात, आणि मग त्या जाळून अथवा जमिनीत खोलवर पुरून टाकाव्यात.



**पैशांची देवाणघेवाण:**

तुम्हाला मोठ्या प्रमाणात नोटा आणि नाणी हाताळावी लागत असल्यास त्यांमधून विषाणूचा प्रसार होणार नाही याची विशेष काळजी घेण्याची गरज आहे. शक्य तेव्हा तुमचे हात वारंवार साबणाने धुवा. पैसे हाताळताना तुम्ही हातमोजे सुद्धा वापरु शकता, पण हातमोजे घातलेले असताना तुमचा इतर कोणत्याही गोष्टीला स्पर्श होणार नाही याची काळजी घ्या. पैसे एका स्वतंत्र पेटीत ठेवा, आणि ती पेटी रोज दिवसाअखेर साबण आणि पाण्याने धुण्याची खबरदारी घ्या. शक्य असल्यास आर्थिक व्यवहारासाठी एका स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक करा, आणि त्या व्यक्तीचा दुकानातील इतर कोणत्याही वस्तूस अथवा पृष्ठभागास स्पर्श होणार नाही याची काळजी घ्या. ग्राहकांना ऑनलाईन कॅशलेस व्यवहारांसाठी उत्तेजन द्या.

**घरपोच सेवा:**

ग्राहक त्याच्या घराबाहेर जिथून वस्तू घेऊन शकेल अशा ठिकाणी वस्तू पिशवी किंवा खोक्यात घालून ठेवा. घरामध्ये प्रवेश करू नका. पैशाला हात लावणे टाळण्यासाठी छोटा डबा अथवा पिशवी वापरा. लगेच हात धुणे शक्य असेल अशा ठिकाणी (उदा. दुकानात) पोचल्यावरच पैसे हाताळा.






**माहितीचित्रासाठी सारांश:**

कामगारांसाठी आणि ग्राहकांसाठी दुकाने सुरक्षित कशी करावीत?

**दुकानदारांसाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना:**

- शक्य तितक्या वेळा हात धुवा
- चेहऱ्याला स्पर्श करणे टाळा
- मास्क घाला
- काउंटर आणि इतर पृष्ठभाग (हॅंडल, झाकणे, इ.) स्वच्छ करण्यासाठी साबणाच्या पाण्याचा वापर करा.
- पुन्हा वापरता येण्याजोगे कॅप्स, मास्क्स, एप्रन इतर कपड्यांपेक्षा वेगळे डिटर्जंटने धुवा.
- जर तुम्ही आजारी असाल तर कामावर येऊ नका.
- बाहेरून घरी आल्यावर साबणाने अंघोळ करा.
- कामावर घालायचे कपडे वेगळे धुवा.




**दुकानासाठी घाऊक खरेदी आणि सामान उतरवून कसे घ्यावे:**

- शक्य असल्यास डिलिवरी दुकानाच्या बाहेरच घ्या
- खोकी साबणाच्या पाण्याने पुसून घ्या
- खोकी / क्रेट्स मोकळी करा
- वस्तू आत आणा

**वस्तूंचा साठा:**

- तांदूळ डाळ यांसारख्या सुट्या वस्तू झाकण असलेल्या डब्यांमध्ये साठवा.
- दिवसअखेर हे डबे पुसून घ्या.
- फळे आणि भाज्या खुल्या भागात विक्रीसाठी ठेवायला हरकत नाही.

**वस्तूंची विक्री:**

- लहान घरगुती दुकाने: ग्राहकांना प्रवेशद्वाराजवळच सेवा द्या.
- मोठी घरगुती दुकाने: प्रवेश करण्यापूर्वी ग्राहकांना हात धुवायला लावा आणि आतल्या ग्राहकांची संख्या जागेच्या प्रमाणात मर्यादित ठेवा
- मोठी दुकाने/ बाजारपेठा: ग्राहकांना एकमेकांपासून १-२ मीटर अंतर राखण्यास सांगा.
- दुकानाबाहेर ग्राहकांच्या रांगांसाठी प्रत्येकी १-२ मीटर अंतर राखून वर्तुळे आखून घ्या.



**पैशांची देवाणघेवाण:**

- नोटा आणि नाणी एका स्वतंत्र पेटीमध्ये ठेवा आणि ही पेटी रोज दिवसाअखेर साबण आणि पाण्याने स्वच्छ करा.
- पैसे हाताळल्यानंतर हात स्वच्छ धुवा
- शक्य असल्यास रोख व्यवहारासाठी एका स्वतंत्र व्यक्तीची नेमणूक करा आणि ऑनलाईन कॅशलेस व्यवहारांना प्राधान्य द्या

**सामान घरपोच कसे द्यावे:**

- वस्तू घराबाहेरच ठेवा आणि ग्राहकांच्या घरामध्ये प्रवेश करणे टाळा
- छोटा डबा अथवा पिशवी वापरूनच पैसे हाताळा
- चलन हाताळल्यानंतर लगेच हात धुणे शक्य असेल अशाच ठिकाणी पैशाला हात लावा.

इथली माहिती विज्ञानसिद्ध, यथातथ्य आणि नेमकी असावी यासाठी यथायोग्य आणि यथाशक्य प्रयत्न केलेला आहे. तरीही काही चुका राहून गेल्या असल्या तर आम्हाला इथे कळवावे: indscicov@gmail.com. धन्यवाद.